# शाहू महाराज यांच्या उदयोग आणि सहकारावरील आर्थिक विचारांची समकालीन प्रस्तुता

**सौरभ महादेव नरूटे,** संशोधक विदयार्थी, अर्थशास्त्र विभाग न्यू कॉलेज कोल्हापूर.

**प्रस्तावना :–**

शाहू भोसले :– (26 जून 1874 – 6 मे 1922) छत्रपती शाहू महाराज राजर्षी शाहू महाराज कोल्हापूर शाहू व चौथे शाहू नावाने प्रसिध्द. हे एक भारतीय समाजसुधारक व कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती ( 1884 – 1922) दरम्यान होते. ब्रिटिश राज्य सतेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहूजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले. सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली. तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित (अस्पृश) व मागासवर्गीय समाजाच्या विकासाठी महत्वाची भूमिका बजावली. महाराजांना " राजर्षी " हि पदवी कानपूरच्या कुर्मी समाजाने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमूख समाज सुधारकांचा वैचारिक वारसा लाभला. असल्यामुळे या राज्यास "फुले – शाहू– आंबेडकरांचा महाराष्ट्र" असे म्हणतात.

आधुनिक व शास्त्रीय पध्दतीने शेतीचा विकास घडवून आणत असता. आपल्या लोकांनी केवळ शेतीवरच अवलंबून न राहता, व्यापार – उदयोगाच्या क्षेत्रात प्रवेश केला पाहिजे. कारण आधुनिक काळात राष्ट्राची उन्नती हि व्यापार– उदयोगावर अवलंबून असल्याचे मत, शाहू महाराजांनी अनेक सभा – परिषदांमधून व्यक्त केलेले आहे.

**उदिदृष्टे :–**

1) शाहू महाराजांचे औदयोगिक विकासातील योगदान जाणून घेणे.
2) शाहू महाराज यांचे सहकारी चळवळीतील कार्याचा आढावा घेणे.
3) शाहू महाराज यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तूत शोध निबंध दुय्यम साधनसामुग्रीवर आधारीत आहे. दुय्यम तथ्य संकलनाकरिता संदर्भ ग्रंथ, पुस्तके मासिकांच्या आधारे शोध निबंधाची मांडणी केलेली आहे.

**उदयोग आणि सहकाराची संकल्पना :–**

राष्ट्राची उन्नती व्यापारावर अवलंबून आधुनिक व शास्त्रीय पध्दतीने शेतीचा विकास घडवुन आणत असता, आपल्या लोकांनी केवळ शेतीवरच अवलंबून न राहता, व्यापार – उदयोगाच्या क्षेत्रात प्रवेश केला पाहिजे. कारण आधुनिक काळात राष्ट्राची उन्नती ही व्यापार – उदयोगावर अवलंबून असल्याचे मत, शाहू महाराजांनी अनेक सभा– परिषदांमधून व्यक्त केलेले आहे.

1917 साली, खामगाव येथे भरलेल्या " अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदे" च्या अधिवेशनात, आपल्या अध्यक्षीय आपल्या ज्ञाती बंधूना उपदेश करताना ते म्हणतात. " आम्ही शेतकरी किंवा सैनिकच होऊन रहावे " ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही. म्हणून व्यापार – धंदे व इतर उच्च प्रतिचे व्यवसाय, यात आम्हांस शिरण्याची जरूरी आहे. हल्ली व्यापारात आम्ही पडतच नाही. विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नती व्यापार व तत्ससंबंधीची चळवळ, यावर अवलंबून आहे. येथे धर्म म्हणजे" बुध्दियुक्त स्वहीत" साधने, असे मी समजतो. व्यापार करण्याचे साहस आम्ही केले नाही, तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील. " बोले तैसा चाले" या न्यायाने महाराजांनी आपल्या दोन्ही पुत्रांना व्यापार –उदयोगात घातले होते आणि त्या क्षेत्रात ते उत्तम प्रगती करत असल्याचेही महाराजांनी या भाषणात सांगीतले आहे.

**शाहूपुरी, जयसिंगपूर इत्यादी बाजारपेठांची निर्मिती :–**

कोल्हापूर संस्थानात गुळाचे उत्पादन मोठया प्रमाणवर होत असे पण या गुळाची बाजारपेठ कोल्हापूरात नव्हती. कोल्हापूरचा गुळ कोकणात राजापूरच्या व्यापारी पेठेत पाठविला जाई आणि तेथून तो "राजापूर गुळ म्हणून " मुंबई वगैरे ठिकाणी धाडला जाई. चा अर्थ गुळ कोल्हापूरचा आणि नाव राजापूरचे! शाहू महाराजांनी ही परिस्थिती बदलवून आपल्या राज्यातच गुळाची बाजारपेठ निर्माण करायचे ठरवले.

राज्यावर आल्यावर दुसऱ्याच वर्षी महाराजांनी रेल्वे स्टेशन जवळ " शाहूपुरी" ही नवीन बाजारपेठ वसविण्याचे कार्य हाती घेतले गेले. कोल्हापूर, कागल, निपाणी येथील व्यापारी वर्गासखास सवलती देऊन त्यांना वखारी घालण्यास प्रोत्साहन देण्यात आले. अवघ्या 5/7 वर्षात ही नवी बाजारपेठ जोमाने उभी राहीली. व्यापाऱ्यांची वस्ती वाढली, आर्थिक व्यवहार वाढले, संस्थानामधील शेती मालास संस्थानातच बाजारपेठ मिळाली. 1902 पर्यंत ही बाजारपेठ मोठया भरभराटीस आली.

लाखो रूपयांची उलाढाल होऊ लागली. खुद्द महाराजांनी आपल्या एका पत्रात, या बाजारपेठेतून दरवर्षी 50 लाखांचा गुळ व 20 लाखांचा भुईमूग निर्यात झाल्याची माहिती दिली आहे. आजही सर्व देशात, कोल्हापूर ही गुळाची सर्वात मोठी बाजारपेठ मानली जाते.

अशा प्रकारची एक बाजारपेठ संस्थानाच्या पूर्व भागातील शिरोळ गावी निर्माण केली गेली (इ.स. 1917). या पेठेचे नामकरण, महाराजांनी आपल्या जनक वडीलांचे नावे, "जयसिंगपूर "असे केले. हीही पेठ पुढे व्यापारी दृष्टया भरभराटीस आली.

**उदयोगधंद्याच्या क्षेत्रात अनेक अभिनव प्रयोग :–**

प्रत्येक क्षेत्रातील प्रगती ही नियोजन बध्द असायला हवी, असे महाराजांना वाटत असे. म्हणूनच त्यांनी आपल्या संस्थानात, औद्योगिक सर्वेक्षण करून, उपलब्ध साधन संपतीच्या जोरावर कोणकोणते नवे उदयोग धंदे सुरू करता येतील, याचा अंदाज घेतला आणि मग त्यानुसार त्यांनी मोठया कल्पकतेने स्वतः अनेक नवे उदयोग सुरू केले. काही उदयोग लोकांनी सुरू करावेत म्हणून त्यांना त्यांनी प्रोत्साहन व चालना दिली. त्यानुसार 1905 पर्यंत, कोल्हापूर संस्थानात सुगंधीत औषधी तेल उदयोग, मधुमक्षीकापालन उदयोग, काष्ठार्क उदयोग आणि सुती कापड उदयोग सुरू केले गेले. त्यासाठी देशाच्या विविध भागात महाराजांनी आपली माणसे, त्या त्या उदयोगाचे प्रशिक्षण घेण्यासाठी पाठविली अथवा बाहेरची प्रशिक्षित माणसे, आपल्या संस्थानात अधिकार पदी नेमली. अशा बाहेरच्या तज्ज्ञ लोकांच्या हाताखाली आपली माणसे तयार व्हावीत आणि मग त्यांनी स्वतंत्रपणे आपले उदयोग चालवावेत, ही त्यामागची महाराजांची दृष्टी असे.

**शाहू छत्रपती मिल्सची स्थापना : सन 1906**

1906 साली कोल्हापूरात, ''शाहू छत्रपती मिल्स'' या कापड गिरणीची स्थापना करण्यात आली. या मागे शाहूमहाराजांचीच प्रेरणा होती. कोल्हापूर संस्थानचा, उदयोगधंद्याच्या क्षेत्रातील हा सर्वात मोठा प्रकल्प होता. अशा प्रकारचे मोठ मोठे उदयोग कोल्हापूरात स्थापन झाले पाहिजेत, हा निश्चय त्यांनी युरोपच्या दौऱ्यावर असतानाच केला होता. तो या गिरणीच्या रूपाने साकार झाला.

या गिरणीच्या उभारणीसाठी विस्तीर्ण जागा, शेजारचे पाण्याचे तळे आणि 50 हजार रूपयांचे भांडवल महाराजांनी दिले. या उदयोगामुळे कोल्हापूरातील शेकडो लोकांना रोजगार उपलब्ध झाला. इतकेच नव्हे, तर कोल्हापूर हे हिंदूस्थानच्या कापड उदयोगाच्या नकाशावर ठळकपणे दिसू लागले. 27 सप्टेंबर 1906 रोजी, दसऱ्याच्या शुभमूहर्तावर, या गिरणीचे उद्घाटन महाराजांच्या हस्ते झाले.

**सहकार तत्वाचे आद्य पुरस्कर्ते :–**

हिंदूस्थानातील एखादया संस्थानिकाने उदयोग धंदयाच्या क्षेत्रामध्ये सहकार तत्वाचा पुरस्कार करणे ही घटना त्याकाळी तरी अपूर्वच होती. महाराजांनी या तत्वाचा जोरदार पुरस्कार करून, आपल्या संस्थानातील अनेक उदयोग धंदयांना चालना दिली. समाजात शासकीय यंत्रणेव्दारे उदयोग सुरू करण्याऐवजी, लोकांनी पुढे होऊन सहकारी तत्वावर ते सुरू करावेत, असे उद्गार महाराजांनी 1906 सालीच, कोल्हापूरातील कापड गिरणीच्या उद्घाटन प्रसंगी काढले होते. 1918 साली, मुंबईच्या कामगार सभेत, कामगारांनी सहकार तत्वावर चालणाऱ्या पतपेढया प्रत्येक चाळीत व प्रत्येक कारखान्यात काढाव्यात, असा त्यांनी सल्ला दिला होता.

**सहकार कायदा आणि वर्तमान :–**

शाहूमहाराजांनी 1912 साली, सहकार तत्वास कायद्याचे स्वरूप दिले. '' सहकारी संस्थानविषयक कायदा'', या नावाने कायदा जारी केला. सहकारी संस्थाची कायदेशीर नोंदणी करण्यासाठी, सहकार ''निबंधकाची '' ;त्महपेजतंतद्ध नेमणूक करण्यात आली. दुसऱ्याच वर्षी म्हणजे, 1913 साली, कोल्हापूरात '' दि कोल्हापूर अर्बन को – ऑपरेटिव्ह सोसायटी लि.'' ही पहिली सहकारी संस्था भास्करराव जाधवांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली. 1921 सालापर्यंत संस्थानातील सहकारी संस्थाची संख्या 37 पर्यंत पोहचली उत्तरोतर कोल्हापूर संस्थानातील सहकारी चळवळींची संख्यात्मकच नव्हे, तर गुणात्मक वाढ होत राहीली. आज सहकारी तत्वांवर चालणाऱ्या विविध उदयोग– व्यवसांयामुळे, कोल्हापूर जिल्हा हरित क्रांतीत श्वेतक्रांतीत महाराष्ट्रात अग्रेसर आहे.

**सारांश :–**

साखर उदयोग, दूध संकलन आणि सुत उत्पादन, या तीन उदयोगांच्या सहकारी क्षेत्रात आज कोल्हापूर जिल्हा आघाडीवर आहे. साखर उदयोगात तर कितेक दशके कोल्हापूर जिल्हा अग्रेसर राहीला असून, महाराष्ट्रातील सर्वाधीक साखर उतारा देण्याचा विक्रम त्याने सातत्याने टिकवून धरला आहे. जिल्हयातील '' कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ '', ही सहकारी संस्था राष्ट्रीय पातळीवर दुध संकलनाचे विक्रम करणारी संस्था ठरली आहे. महाराष्ट्रात कापूस उत्पादीत होतो विदर्भ – मराठवाडयात, पण या कापसापासून सूत उत्पादीत करणाऱ्या सर्व महाराष्ट्रात आदर्श आणि कार्यक्षम ठरलेल्या सुत गिरण्या आहेत, कोल्हापूर जिल्हयात. कापूस उत्पादीत न करणाऱ्या कोल्हापूर जिल्हयातील सहकारी तसेच खाजगी सूत गिरण्या, आज उत्कृष्ट सूत निर्मीती करून, त्याची परदेशाला मोठी निर्यात करीत आहेत.

**संदर्भ ग्रंथ :–**

१) साने गीता,१९८६,भारतीय स्त्रीजीवन,मौज प्रकाशन,मुंबई.

२) ओरडो व्हा. एल आणि कांबळे नारायण,२०२१,परिवर्तनवादी विचारप्रवाह, भारती मुद्रणालय, कोल्हापूर.

३) गोटे- गव्हाणे शुभांगी, २००३, स्त्री परिवर्तनाची आव्हाने, साउथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन,औरंगाबाद.

४)जाधव रमेश,२००५, लोकराजा शाहू धत्रपती, सुरेश एजन्सी, कोल्हापूर.

५) जयसिंगराव पवारए २००१, राजर्षि शाहू स्मारक ग्रंथए महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.

६) आढाव विलास, गुप्ता पी. व्ही.२०२०, वंचित घटक सक्षमीकरणाची रचनात्मक दिशा, शब्दवैभव प्रकाशन, जळगांव.

७) समाज प्रबोधन पत्रिका, जानेवारी-मार्च २०१४,

८) कॉ. गोविंद पानसरे, १९९७, राजर्षि शाहू वसा आणि वारसा, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी.

९) जयसिंगराव पवार, राजर्षि शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी. कोल्हापूर.

१०) घोडेश्वर प्रवीण,२०१६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समकालीन प्रश्न, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठए नाशिक.

११) पवार जयसिंगराव, लठ्ठे आण्णासाहेब श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.